महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ ०२ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# भाजपच्या उर्वरित नव्या २२ जिल्हाध्यक्षांची नियुक्ती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एक हाती सत्ता काबीज करण्यासाठी सर्वंच पक्षांनी कंबर कसली आहे. याआधी ५८ जिल्हाध्यक्षाच्या नावाची घोषणा केल्यानंतर भाजपने आणखी २२ जिल्हाध्यक्षाच्या नावाची घोषणा केली आहे. तसेच राज्यात भाजपच्या जिल्हाध्यक्षांची संख्या ८० वर पोहोचली आहे.

भाजपच्या दुसऱ्या यादीत मुंबई आणि नाशिकमधील जिल्हाध्यक्षांचा समावेश आहे. भाजपने उत्तर पश्चिम मुंबई जिल्हाध्यक्षपदी ज्ञान मूर्ती शर्मा, दक्षिण मध्य मुंबईच्या जिल्हाध्यक्षपदी नीरज उभारे तर दक्षिण मुंबईच्या जिल्हाध्यक्षपदावर शलाका साळवी यांची नेमणूक केली आहे. नाशिक शहरच्या जिल्हाध्यक्ष पदाची माळ सुनील केदार यांच्या गळयात पडली आहे.

भाजपानं २२ जिल्हाध्यक्ष तसंच शहराध्यक्षांची यादी वेटिंगवर ठेवली होती. या ठिकणी वाद असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला होता. अखेर बरंच मंथन केल्यानंतर या २२ जणांची यादी जाहीर करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर लवकरच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. साधारणत: सप्टेंबर किंवा ऑक्टोबरमध्ये निवडणुका होतील, अशी शक्यता आहे. त्यादृष्टीने भाजपाने संघटनात्मक पातळीवर बदल करण्यास सुरूवात केली होती. भाजपाला गटबाजीमुळे काही ठिकाणी नावं जाहीर करण्यास विलंब झाला.

राज्यात महानगरपालिका तसंच इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने भारतीय जनता पार्टीने जोरदार तयारी सुरू केली आहे. या निवडणुका महायुती म्हणून एकत्र लढणार की काही ठिकाणी स्वबळावर आणि मैत्रिपूर्ण लढती होणार, याबाबत अद्याप चर्चा सुरू आहेत. मात्र, भाजपाने सर्व जिल्हे आणि शहराध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर करुन निवडणुकीच्या दृष्टीने पक्षांतर्गत बदल करण्यास सुरूवात केली आहे. दोन आठवड्यांपूर्वी ५८ जिल्हाध्यक्ष आणि शहराध्यक्षांची नावं भाजपानं जाहीर केली होती. त्यानंतर आता उर्वरित २२ जिल्हाध्यक्ष आणि शहराध्यक्षांची नावं जाहीर करण्यात आली आहे. त्यात अनेक जिल्ह्यांमध्ये भाजपाने बदल केले आहेत. तर, बीडमध्ये शंकर देशमुख यांनाच जिल्हाध्यक्षपदी कायम ठेवलं आहे.




**महिला अध्यक्ष किती? -**

आतापर्यंत जाहीर केलेल्या ८० जणांच्या यादीत ५ महिलांना अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. त्यात वसई विरारमध्ये प्रज्ञा पाटील, दक्षिण मुंबईमध्ये शलाका साळवी, गोंदिया येथे सिता रहांगडाले, पुसदमध्ये डॉ. आरती फुफाटे, सोलापूर शहरमध्ये रोहिणी तडवळकर यांचा समावेश आहे.

### भाजपचे जिल्हाध्यक्ष

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | उत्तर -पश्चिम मुंबई ज्ञानमूर्ती शर्मा | 12 | गडचिरोली रमेश बारसागडे |
| 2 | दक्षिण-मध्य मुंबई नीरज उभारे | 13 | चंद्रपूर शहर सुभाष कासमगट्टावार |
| 3 | दक्षिण मुंबई शलाका साळवी | 14 | चंद्रपूर ग्रामीण हरीष शर्मा |
| 4 | पालघर भरत राजपूत | 15 | वर्धा संजय गाते |
| 5 | वसई- विरार प्रज्ञा पाटील | 16 | परभणी ग्रामीण सुरेश भुंबरे |
| 6 | अहिल्यानगर शहर अनिल मोहिते | 17 | छत्रपती संभाजीनगर किशोर शितोळे |
| 7 | नाशिक शहर सुनील केदार | 18 | लातूर शहर अजित पाटील कव्हेकर |
| 8 | नाशिक दक्षिण सुनील बच्छाव | 19 | लातूर ग्रामीण बसवराज पाटील |
| 9 | नाशिक उत्तर यतीन कदम | 20 | नांदेड उत्तर ॲड. किशोर देशमुख |
| 10 | पुणे दक्षिण (बारामती) शेखर वढणे | 21 | नांदेड दक्षिण संतुकराव हंबर्डे |
| 11 | कोल्हापूर शहर विजय जाधव | 22 | बीड शंकर देशमुख |

थोडक्यात महत्वाचे

## भिवंडीत १३३ जन्म - मृत्यू प्रमाणपत्रे रद्द

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** भिवंडी, ता. १ (बातमीदार) : तालुक्यातील जन्म-मृत्यूच्या प्रकरणांचा मुदतीत निपटारा करण्यासाठी भिवंडीचे अधीनस्त नायब तहसीलदारांना प्राधिकृत करण्यात आले होते. दरम्यान, तारखेपासून एक वर्षानंतर प्राप्त होणारी प्रकरणे अधिक असल्याने १३३ जन्म-मृत्यूचे दाखले रद्द करण्यात आले आहेत.

भिवंडी महापालिका क्षेत्र आणि ग्रामीण ग्रामपंचायती क्षेत्रातील ११ आगस्ट २०२३ ते २१ जानेवारी २०२५ या कालावधीत नायब तहसीलदारांकडून जन्म-मृत्यूचे १३३ दाखले देण्यात आले. या दाखल्यांचा शैक्षणिक, जमिनीचे व्यवहार तसेच इतर सरकारी कामांबरोबर वैयक्तिक कामासाठी उपयोग केला जाणार होता. पण तहसीलदार अभिजित खोले यांनी हे दाखले रद्द केले असून, सक्षम अधिकाऱ्याकडून फेरतपासणी/पडताळणी करून तातडीने निर्णय घेऊन पुढील कारवाईचे निर्देश दिलेले आहेत. या नोंदी बदलण्यासाठी नवीन दाखले मिळवावे लागणार आहेत. तसेच नोंदणी करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे महापालिका आणि ग्रामपंचायतींना तहसील कार्यालयातून

लेखी पत्र पाठवून दाखले रद्द केल्याची माहिती दिली आहे.

भारत सरकारच्या विधी व न्याय विभागाकडील ११ आगस्ट २०२३ रोजीच्या राजपत्रात जन्म-मुत्यू नोंदणी (सुधारणा) कायद्यानुसार ठाणे जिल्हा दंडाधिकारी यांनी भिवंडी तालुक्यातील जन्म मृत्यूच्या तारखेपासून १ वर्षानंतरच्या विलंबाने प्राप्त झालेल्या प्रकरणांमध्ये जन्म-मृत्यूची नोंद करण्याबाबत अनुषंगिक कार्यवाही करून आदेश देण्यासाठी भिवंडी तालुक्याचे कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना अधिकार प्रदान केले होते.

तहसील कार्यालयातील नायब तहसीलदारांनी दिलेले दाखले अचानकपणे रद्द केल्याने महापालिका हद्दीत तसेच ग्रामीणमधील ग्रामपंचायत हद्दीत राहणारे दाखलेधारक हैराण झाले आहेत. या दाखल्यांसाठी त्यांना नव्याने कागदपत्रे सादर करावी लागणार आहेत. तसेच दाखल्यांच्या वापरावरदेखील सुधार करावा लागणार असल्याने तहसील कार्यालयाच्या कारभाराचा फटका स्थानिकांना बसला आहे.

## अंबरनाथमध्ये पोलिसांचा मॉक ड्रिल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ, ता. १ (वार्ताहर)**

अंबरनाथमध्ये आगामी सण आणि उत्सवांच्या निमित्ताने पोलिसांचा मॉक ड्रिल पार पडला. या वेळी अंबरनाथ, शिवाजीनगर आणि हिललाइन पोलिस उपस्थित होते. हा मॉक ड्रिल पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. दरम्यान, नागरिकांनाही शहरात शांतता राखण्याचा संदेश दिला. पावसाळ्यासोबत विविध धार्मिक सण आणि उत्सवांचे दिवसही सुरू झाले आहेत. अशात यदाकदाचित शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिल्यास त्यावर वेळीच नियंत्रण कसे मिळवायचे याबाबत पोलिसांनी अंबरनाथमध्ये शनिवारी (ता. ३१) पूर्वच्या हुतात्मा चौकात मॉक ड्रिल केले. या वेळी चित्तथरारक प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून एकप्रकारची रंगीत तालीम करण्यात आली. सण, उत्सवाच्या काळात अनेकदा जमावाची परिस्थिती उद्भवते. परिणामी, परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनाही बळाचा वापर करावा लागतो. दरम्यान, कुठल्या परिस्थितीत कशा प्रकारची पावले उचलायची आणि नियंत्रण कसे मिळवायचे, याबाबत पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांनी मार्गदर्शन केले. या वेळी अंबरनाथ पोलिस सहआयुक्त शैलेश काळे, शिवाजीनगर ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश पाटील, अंबरनाथ ठाण्याचे पोलिस निरीक्षक किशोर शिंदे, हिललाइन ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अनिल जगताप तसेच तिन्ही ठाण्यांचे पोलिस कर्मचारी, हवालदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पोलिस कर्मचारी सुरक्षा ढाल, लाठी, बंदुकांसह तैनात होते. या तालमीत सर्वप्रथम जमावावर पाण्याचा मारा केला. दरम्यान, जमाव शांत होत नसल्यामुळे पुढे गॅसचा वापर करतात. त्यानंतर लाठी चार्ज आणि शेवटी प्लॅस्टिक बुलेटची फायरिंग करतात. या दरम्यान जमावातील एक जण जखमी होतो. त्याला तत्काळ स्ट्रेचरवरून दवाखान्यात हलविण्यात येते, अशा पद्धतीची प्रात्यक्षिके पोलिसांनी केली.

हा मॉक ड्रिल अंबरनाथ पूर्वेच्या हुतात्मा चौकात घेण्यात आले. या वेळी उल्हासनगर आणि अंबरनाथ या दोन्हीमध्ये आणखी योजना राबवण्यात येतील, अशी माहिती सचिन गोरे यांनी दिली. दरम्यान, परिसरात कोणतीही घटना घडल्यास त्यासंदर्भात त्वरित पोलिसांना माहिती देणे, कोणतीही अफवा पसरल्यास ती पोलिसांच्या निदर्शनास आणून देणे, समाजमाध्यमांवर समाजात तेढ निर्माण करेल, दंगा घडवेल अशी कोणतीही अफवा अथवा पोस्ट फॉरवर्ड करू नये, तसेच सतर्क राहून आपल्या शहरात शांतता कायम राहील यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनदेखील सचिन गोरेंनी नागरिकांना केले.

## इगतपुरी - आमणे समृद्धी महामार्गाच्या लोकार्पणाला ५ जूनचा मुहुर्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर (वार्ताहर) :** मुंबई-नागपूर समृद्धी शीघ्रगती महामार्गाचा ठाणे जिल्ह्यातील आमणे ते इगतपुरी हा ७६ किमीचा शेवटचा टप्पा ५ जून रोजी वाहतुकीसाठी खुला करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्याच्या उद्धाटनाचा कार्यक्रम जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील आमणे येथे न घेता त्याऐवजी नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथे करण्यात येणार आहे.

याआधी पहिल्यांदा फेब्रुवारीमध्ये उद्धाटन करण्यात येणार होते. व त्यानंतर १ मे या महाराष्ट्र दिनी उद्धाटन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु उद्धाटनाचे हे दोन्ही मुहूर्त हुकले. त्यामुळे समृद्धी महामार्ग पुर्णत्वास येऊनही त्याचा मुंबई दिशेच्या अखेरच्या टप्प्याचे उद्धाटन रखडले आहे. सध्या या महामार्गावरील आवश्यक सर्व कामे पूर्ण झाली आहेत. मात्र मुख्यमंत्री व महत्त्वाच्या नेत्यांच्या तारखा मिळत नसल्याने हे उद्धाटन लांबल्याचे अधिकारी खाजगीत सागतात.

मात्र नुकतेच न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका कुठलीही सबब न देता घेण्याचे निर्देश दिल्यानंतर खडबडून जागे झालेल्या शासनाने समृद्धीच्या ठाणे जिल्ह्यातील अखेरच्या टप्प्याचे उद्धाटन करण्याचे निश्चित केले आहे. आगामी पावसाळी अधिवेशनापूर्वी हा महामार्ग सुरु करुन विरोधकांना देखील शांत करण्याचा प्रयत्न असावा, असे देखील म्हटले जात आहे.

**नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गातील इगतपुरी ते आमणे या ७६ किमीच्या टप्प्याच्या लोकार्पणाला अखेर मुहुर्त मिळाला आहे. गुरुवारी, ५ जूनला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इगतपुरी येथे एका सोहळ्यात या टप्प्याचे लोकार्पण होणार आहे. गुरुवारीच हा टप्पा वाहतूक सेवेत दाखल करण्यात येणार आहे.**

**7.74 किमीच्या शहापूर तालुक्यातील सर्वात मोठ्या वाशाळा येथील बोगद्यामुळे कसारा घाट ओलांडणे अतिशय सोपे झाले आहे. 36 मिटरची रुंदी आणि 6 पदरी महामार्गामुळे प्रवास जवळचा झाला आहे.**



**"मुंबई आणि नागपूर या दोन शहरातील प्रवासाचे अंतर १६ तासांवरुन आठ तासांवर आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाकडून ७०१ किमीचा नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्ग बांधण्यात आला आहे. या महामार्गातील नागपूर ते इगतपुरी असा ६२५ किमीचा टप्पा सध्या वाहतूक सेवेत आहे. तर इगतपुरी ते आमणे टप्प्याचे काम एप्रिलमध्ये पूर्ण झाले आहे. ५ जूनला या टप्प्याचे लोकार्पण होणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.**









## वाचक मनोगत

### हवामान बदलले , नालेसफाईचा पॅटर्न देखील बदला

पावसाळा पूर्व नालेसफाईला भ्रष्टाचार ,आर्थिक अनागोंदी , तिजोरीची लूट याची मगर 'मिठी ' किती मोठ्या प्रमाणावर बसलेली आहे याची प्रचिती वारंवार येत असते . भ्रष्टाचार मुक्त कारभाराचा बिमोड करणारे सरकार अस्तित्वात येऊन देखील सदरील मिठी सुटण्याऐवजी अधिकच घट्ट होताना दिसते आहे . प्रतिवर्षी तब्बल ४५० करोड रुपये खर्च करून देखील मुंबई शहरातील नाले -गटारी काही गाळमुक्त होताना दिसत नाही . नालेसफाईचा फायदा एकच 'सरकारमान्य भ्रष्टाचार " अशा पद्धतीने कंत्राटदार ,अधिकारी , नगरसेवकांचे खिसे भरले जातात . मिठी नदीच्या स्वच्छतेसाठी आजवर करोडो रुपये खर्च करूनही तिची गाळयुक्त दुरावस्था पाहता हे स्पष्टपणे लक्षात येते की हा प्रकार केवळ 'तिजोरी सफाई ' चा प्रकार आहे .

११ महिन्यांचा गाळ केवळ १ महिन्यात काढण्याचे नियोजन हा प्रकार नागरिकांची प्रशासनाने केलेली शुद्ध धूळफेक ठरते . राज्यातील महानगरपालिकांनी तुकड्या तुकड्यात गटारे -नाले सफाई साठी काढलेल्या निविदा उघड्या डोळ्याने पाहिल्या तर डोळे फिरण्याची वेळ येऊ शकते . ७००/८०० मीटर नाल्याच्या सफाईसाठी महापालिका तब्बल ३०/४० लाख रुपये खर्च करताना दिसतात . ब्रिटिशांनाही लाजवेल अशी लूट नालेसफाईच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभर सुरु असल्याचे दिसते . राज्यातील प्रमुख महापालिकांच्या नालेसफाईवरील मागील ५ वर्षाच्या ताळेबंद तपासाला तर भ्रष्टाचाराला किती राजमान्यता , लोकप्रतिनिधी मान्यता प्राप्त झालेली आहे याची प्रचिती येऊ शकते . भ्रष्टचारमुक्त कारभाराचे स्वप्न किती कोसो दूर आहे हे सुस्पष्ट होते .एकुणातच नाले गटारी सफाई हि प्रक्रियाच सदोष असल्याचे दिसते . होते काय की पावसाळा पूर्व नाले सफाईच्या नावाने एप्रिल मध्ये कंत्राटे काढली जातात . प्रत्यक्ष गाळ काढण्यास मे उजाडतो . त्यामुळे नाले सफाई होण्याआधीच मान्सूनपूर्व सरी कोसळण्यास सुरुवात होते आणि बऱ्याच ठिकाणी काढलेला गाळ पुन्हा नाल्यात जातो तर कागदावरती १०० टक्के नालेसफाई दाखवत बिले काढली जातात . २१ व्या शतकातील सुनियोजित शहराच्या नवी मुंबई महानगरपालिकेत तर अगदी मे अखेरीस नाले सफाईचे कंत्राटे काढली जात आहेत . २६ मे २०२५ ला झालेल्या मुसळधार पावसाने नाल्यातील गाळ ,प्लॅस्टिक नैसर्गिक पद्धतीनेच खाडीत वाहून गेलेले आहे . त्यामुळे आता नालेसफाईचे टेंडर काढण्यामागे आता नेमका कोणता 'अर्थ ' हा प्रश्न अनुत्तरित राहतो .

राज्य सरकारने सदोष नाले सफाईमुळे समुद्रा एवढ्या भ्रष्टाचाराला प्रतिबंध घालण्यासाठी पारंपरिक गटारे -नाले सफाईसाठीच्या पारंपरिक पद्धतीत आमूलाग्र बदल करणे निकडीचे आहे . पावसाळापूर्व नाले सफाई हि सदोष संकल्पना रद्द करून राज्यातील प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांना "नाले -गटारे सफाईसाठीचा वार्षिक कृती आरखडा " तयार करण्याचे आदेश द्यावेत . प्रत्येक वर्षी सप्टेंबर मध्ये १२ महिन्यांसाठी नाले -गटारी सफाईचे कंत्राटाची निविदा पूर्ण केली जावी . ज्या कंत्राटदाराला त्या त्या नाल्याच्या ,त्या त्या विभागातील गटारी सफाईचे कंत्राट मिळेल त्यांना ऑक्टोबर पासूनच नाले सफाई ,गटारी सफाई करणे सक्तीचे करावे . प्रत्येक ३ महिन्याला नाले -गटारी सफाईचे जिओ टॅगिंग फोटो -व्हिडीओ महापालिकांना सबमिट करणे सक्तीचे असावे . केलेल्या कामानुसार १२ महिन्यांचे ४ टप्पे करत ४ टप्यात बिले अदा करावेत .

कंत्राटदाराने साफसफाईचे जे फोटो व्हिडीओ पालिकांना सादर केले जातील ते पालिका प्रशासनाला संकेतस्थळावर अपलोड करणे सक्तीचे करावे . त्याच बरोबर करदात्या नागरिकांचा तिसरा डोळा नाले -गटारी सफाईवर राहण्यासाठी व्हाट्सअँप क्रमांक , ईमेल आयडी द्यावेत . त्यावर नागरिकांना नाल्यांचे -गटारींचे फोटो पाठवण्याचे आवाहन करावे . भ्रष्टाचार मुक्त कारभाराच्या घोषणा करणाऱ्या नेत्यांनी ,सरकारने हि गोष्ट लक्षात ठेवावी की जोवर नागरिकांना नाले -गटारी सफाईतील उघड उघड भ्रष्टाचार दिसतो आहे तोवर नागरिकांना नेत्यांच्या ,सरकारच्या घोषणांवर विश्वास ठेवणे शक्य असत नाही .

वर्षानुवर्षे अत्यंत उघडपणे 'चालू ' असणाऱ्या नालेसफाई च्या भ्रष्ट 'मिठी' ला प्रतिबंध घालत 'भ्रष्टाचार मुक्त पारदर्शक कारभाराची वचनपूर्ती ' करण्याची संधी राज्य सरकारला आहे ती संधी सरकारने पावसात वाहून जाऊ देऊ नये हीच महाराष्ट्रातील १२ करोड जनतेची अपेक्षा आहे .

**सजग नागरिक मंच**

## जे वाटूमल साधूबेला महिला महाविद्यालयाचे, कोलंबो (श्रीलंका ) येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन




*जे. जे. टी. विद्यापीठ राजस्थान व आय. सी. बी. टी. कॅम्पस कोलंबो, श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण व जे. वाटुमल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न*

जे. जे. टी. विद्यापीठ राजस्थान व आय. सी. बी. टी. कॅम्पस कोलंबो, श्रीलंका यांच्या संयुक्त विद्यमाने आणि सोसायटी ऑफ सायन्स, टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी, कल्याण व जे. वाटुमल साधुबेला गर्ल्स कॉलेज, उल्हासनगर यांच्या सहकार्याने दिनांक: 23 मे 2024 रोजी घेण्यात आली. बहुशाखीय आंतरराष्ट्रीय परिषद , आय सी बी टी कॅम्पस कोलंबो (श्रीलंका) येथे पार पडली. परिषदेची सुरुवात श्रीलंका आणि भारतीय राष्ट्र गीताने तसेच दिप प्रज्वलनाने झाली. परिषद उद्घाटनप्रसंगी डॉ. इंदुरंगा चमेंद्रा, डॉ. अनोका अनासकी दिशानायके, डॉ. अशोक चव्हाण, डॉ. दीनदयाल मुरारका, डॉ. राजेश कुमार, डॉ. वसंत माळी, डॉ. अंजु सिंग, डॉ. कनिका विडांगे, इ. उपस्थित होते. परिषद च्या सुरुवातीला डॉ. अशोक चव्हाण (छ संभाजीनगर), डॉ. नारायण फडके (मुंबई) व डॉ. स्वप्ना समेल (कल्याण) यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय भरीव योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी परिषदेत तीन प्राध्यापकांचे व्याख्यान आयोजित केले होते . ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून 83 हून अधिक शोधकर्त्यांनी आपल्या संशोधन कार्याचे मौखिक सादरीकरण सादर केले. परिषदेचे प्रसारण फेसबुक लाईव होते तसेच श्रीलंका येथील टी वी वाहीण्या वर प्रसारीत करण्यात आले होते. युवा संशोधकांना प्रोत्साहित करण्यासाठी डॉ. अशोक चव्हाण रिसर्च फाउंडेशन व सोसायटी ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी अँड ह्युमॅनिटी यांच्या वतीने विविध पारितोषिकांचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात श्री. वैभव मिसाळ यांनी सर्वोत्कृष्ट मौखिक सादरीकरण, श्री. अजय झिंजाडे यांनी युवा संशोधक तर डॉ. राणी भगत यांनी नाविन्यपूर्ण संशोधन ही पारितोषिके पटकावली. परिषदे नंतर वेगवेगळया ठीकाणी भेट देऊन अभ्यास केला कॅन्डी येथील पेरीडोनीया बोटॅनिकल गार्डन ला भेट देऊन तेथील विविध वनस्पतीचा अभ्यास केला, पिनावाला हत्ती संगोपन केन्द्रला भेट दिली, तसेच बेन्टोटा येथील कासव संगोपन केन्द्रला भेट देऊन प्लास्टिक चा कासवांच्या जिवावर काय परीणाम होतो जेली फीश समजून प्लास्टिक गिळंकृत करतात नंतर कासव खोल पाण्यात जाऊ शकत नाहीत. औषधी वनस्पतींच्या आणि स्पाईस गार्डन भेट देऊन प्रत्यक्ष वनस्पती बघुन ऊपयोग समजून घेतले एतीहासीक स्थळांना भेटी दील्या सिगेरिया राक , दूबोला केव, गोल्डन टेम्पल, दंबुला, अशोक वाटीकेला भेट दिल्यानंतर रामायणातील आठवणी ताज्या झाल्या चहाच्या च्या कंपनीला भेट देऊन प्रत्यक्ष चहा पावडर कसी केली जाते याचा अभ्यास केला. परिषद यशस्वीरित्या पार पाडण्याकरिता परिषदेचे संयोजक प्राचार्य डॉ वसंत माळी, जे वाटुमल साधुबेला महिला महाविद्यालय संयोजिका डॉ अंजू सिंग यांनी विशेष प्रयत्न केले. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष उत्तमसिंग पवार, सचिव नितीन बागवे, प्राचार्य एम एस कुऱ्हाडे , प्राचार्य नारायण फडके , प्राचार्य युवराज महाजन , प्रा. हीनल वाधवा, प्रा. राजेश कुमार सिंग, डॉ दत्तात्रय काळबांडे, प्रा. शर्मिला कर्वे, अर्चना वर्मा , पुणम, सहीता नानकी , माला अंभोरे, यांनी अभिनंदन केले.

## खापरी जि.प. शाळेतील साहित्यावर चोरांचा डल्ला!

### डिजिटल साहित्य व धान्य चोरीची टोकावडे पोलिस ठाण्यात तक्रार!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**प्रतिनिधी :** मुरबाड तालुक्यातील खापरी गावातील जिल्हा परिषद शाळा आज्ञात चोरट्यांनी फोडली. शाळेतून मुलांचा शिल्लक पोषण आहार धान्य व डिजिटल साहित्य चोरून नेले आहे. मुरबाड तालुक्यातील खापरी या गावातील 7 वी पर्यंत जिल्हा परिषद शाळा आहे. या शाळेत खापरी, कामतपाडा, वैतागवाडी या गावातील मुले इयत्ता ७ वी पर्यंत शिक्षण घेत आहेत. या शाळेत ५ शिक्षक कार्यरत आहेत. सध्या शाळांना सुट्टी असल्याने व शाळा गावच्या बाहेर असल्याचा फायदा अज्ञात चोरट्यांनी घेऊन शाळेतील कार्यालय, वर्ग, स्वयंपाक घर यांच्या खिडक्यांचे ग्रील कटरने कापून ४५ इंचाच्या २ टीव्ही, १ लॅपटॉप, १ प्रिंटर, १ पेन ड्राइव्ह, ही डिजिटल साहित्य चोरून नेले आहे.




> **चोरीचा तपास सुरू केला असून अजूनतरी काही सुगावा लागला नाही तपास सुरू आहे - दिनकर चकोर, सहा. पोलिस निरीक्षक, टोकावडे पोलिस ठाणे.**

त्याचबरोबर तांदूळ २७४ किलोग्राम, मुगडाळ ८६ किग्रा, मसुरडाळ ३९ किग्रा, मटकी २४ किग्रा, वाटाणा ४८ किग्रा, तेल १७ किग्रा असा शिल्लक पोषण आहार धान्य साठाही चोरून नेला असल्याची तक्रार शिक्षक विलास जाधव यांच्याकडून टोकावडे पोलिस ठाण्यात देण्यात आली आहे. सदर शाळेचे शिक्षक टोकावडे पोलीस ठाण्यात तक्रार करण्यास गेले असताना लेखी तक्रार देण्याची गरज नाही. आधी तपास करतो. आणि 2 दिवसात तुम्हाला सांगतो असे पोलिसांकडून सांगण्यात आले.

## कल्याणमध्ये जेष्ठ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** खर्डीकर शैक्षणिक प्रसारक मंडळाच्या वतीने स्पंदन संस्था आणि खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळ एनजिओ यांच्या सयुक्त विद्यमाने कल्याण मधील राणी लक्ष्मीबाई जेष्ठ नागरिक मंडळ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




कल्याण मधील नागरिकांना वैद्यकीय सुविधा उपलब्ध व्हाव्यात या हेतूने हे आरोग्य शिबीर खर्डीकर क्लासेस चे संस्थापक अध्यक्ष डॉ.सुनील खर्डीकर व डॉ. माधुरी कुलकर्णी यांच्या स्पंदन निसर्गोपचार चिकित्सा आणि शिक्षण संस्था यांच्यामार्फत आयोजित करण्यात आले होते. यावेळी मानसोपचार तज्ञ विकास नाईक यांनी देखील आरोग्य तपासणी शिबिरास भेट देत नागरिकांना मार्गदर्शन केले.

खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळ एनजिओ व स्पंदन संस्था तसेच तज्ज्ञ डॉक्टरवर्ग व त्यांची संपूर्ण टीम शिबिरात उपस्थित होती. या शिबिरात सरवाइकल, पोटदुखी , कंबरदुखी, गुडघेदुखी, मानसिक तणाव उपचार, मधुमेह उपचार , ब्लड प्रेशर सारखे आजारांची तपासणी तसेच उपचार करत औषधे वाटप करण्यात आली. या शिबिरामध्ये कल्याण शहरातील सुमारे २०० हून अधिक रुग्णांनी लाभ घेतला असून शिबिरातील डॉक्टरांचा व खर्डीकर संस्थेचे आभार व्यक्त करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासविण्याचे काम खर्डीकर क्लासेस चे संस्थापक डॉ.सुनील खर्डीकर व खर्डीकर शैक्षणिक प्रसारक मंडळाचे खजिनदार संकेत खर्डीकर, करिष्मा खर्डीकर व संगीता खर्डीकर यांच्या सहकार्यातूनच आरोग्य तसेच शैक्षणिक अशा विविध सामाजिक कार्य पार पडत असतात.

तर या वेळी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन पटू करिष्मा खर्डीकर हिने देखील काही उपस्थित रुग्णांवर थेरपीने यशस्वीपणे उपचार केले. शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला असून पुढे देखील अश्याच प्रकारे सामाजिक कार्य सुरू ठेवू, कारण आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो व समाजासाठी माझ्या हातून सामाजिक कार्य असेच घडत राहो अशा भावना डॉ.सुनील खर्डीकर त्यांनी व्यक्त केल्या.

## 'सारे जहाँ से अच्छा या गीतातील हम शब्द मुस्लिम बांधवांसाठी

### - भाजपा नेते डॉ. सुनील देवधर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सारे जहाँ से अच्छा या गीतामध्ये हम जो शब्द आहे हा शब्द मुस्लिमांना म्हंटला आहे. पण आम्ही हिंदू हे कधी समजू शकलो नाही, कारण आमचे पहिले पंतप्रधान जॉनी जॉनी एस पापा होते. ते तेच शिकून आले होते. त्यामुळे आम्ही देखील तेच ऐकले असे भाजपा नेते डॉ. सुनील देवधर यांनी व्यक्त केले.




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शताब्दी जयंती समारोह समिती यांच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्ताने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते. अहिल्यादेवींना मानवंदना देताना त्यांचे कार्य आणि विचार आजच्या काळातही मार्गदर्शक असल्याचे डॉ. सुनील देवधर यांनी स्पष्ट केले.

यावेळी ते म्हणाले की, धनगर समाजातून आलेल्या या तेजस्वी महिलेने राणी म्हणून देशात नावलौकिक मिळवला. तसेच आज मोदींनी महिलांसाठी, सैन्यात दलात संधी, ऑपरेशन सिंदूरसारखे पाऊल उचलले हे सर्व अहिल्यादेवी होळकरांमुळे शक्य झाले. त्याचबरोबर डॉ. देवधर यांनी अहिल्यादेवींच्या काळातील सामाजिक सुधारणांवर प्रकाश टाकला. तसेच स्त्रीधन हे नेहमीच महिला कुटुंबियांच्या हितासाठी वापरतात. स्त्रीधनाचा वापर करून त्यांनी सुमारे १६ कोटी रुपयांचे सामाजिक कार्य केले, असे ते म्हणाले.

आज पंतप्रधानामुळे राज्याचा विकास होतोय. एखाद्याला खरोखर नेता बनायचे असेल तर त्याच्यापुढे अहिल्यादेवींचा आदर्श ठेवला पाहिजे. मुलींना नाचायला नंतर आधी शिक्षण शिकवा. त्यासोबतच भविष्यामध्ये कोणाचे सिंदूर पुसणार नाही असे काम मोदींनी केले आहे हे अहिल्यादेवी मुळे शक्य झाले आहे. तसेच आपल्या देशातील नेत्यांवर श्रद्धा ठेवा हेच आपल्याला वाचवणार आहेत, देशाला विश्वगुरू करणार आहेत. थोडी सबुरी ठेवा जरा काही मनाविरुद्ध घडले की लगेच समाज माध्यमांवर आपल्याच नेत्याविरोधात तलवारी चालवण्याचे काही कारण नाही असे डॉ. देवधर यांनी सांगितले.

## कळव्यातही शिंदेसेनेचा बालेकिला?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** जसा ठाणे हा बाले किल्ला आहे. तसाच आता काळव्याचा देखील बालेकिल्ला झालेला आहे. येथे विकास करायचा आहे आणि विकासाच्या माध्यमातून या भागातल्या सर्वांना न्याय द्यायचा आहे असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.



राष्ट्रवादीचे (शरद पवार गट) नेते आमदार जितेंद्र आव्हाड यांचा कळवा-मुंब्रा विधानसभा मतदारसंघ आहे. कळवा, मुंब्रा येथे राष्ट्रवादीची ताकद होती. महापालिका निवडणूकीत या भागातून राष्ट्रवादीचे नगरसेवक निवडून येत होते. काही दिवसांपूर्वीच आव्हाड यांच्या अतिशय निकटवर्तीय असलेल्या कळवा शहरातील काही माजी नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. त्यामुळे कळव्यात आव्हाडांना मोठा धक्का बसला आहे.

शनिवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे एका कार्यक्रमा निमित्ताने कळवा येथे आले होते. त्यावेळी त्यांनी कळवा हा बालेकिल्ला झाल्याचा उल्लेख केला. या संपूर्ण भागाचा विकास करायचा आहे. धोकादायक इमारती, अनधिकृत इमारतीतील प्रत्येकाला हक्काच घर पाहिजे. महापालिका किंवा राज्य शासनाच्या स्तरावरील प्रश्न हा एकनाथ शिंदे तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून सोडवणार असा दावा शिंदे यांनी केला.

विकासाला कुठेही निधी कमी पडणार नाही ही खात्री मी देतो असेही ते म्हणाले. अडीच वर्ष मी मुख्यमंत्री होतो. त्यावेळेस विकास आणि लाडकी बहीण योजनेसारख्या कल्याणकारी योजना आणल्या. कोणी किती काही म्हटले तरी लाडकी बहीण योजना कधी बंद होणार नाही असा पुनरुच्चार त्यांनी केला.

## मुंबई अहमदाबाद महामार्गावरील उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बोईसर:** मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तीन उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. यामुळे वाहतूक कोंडीने त्रस्त वाहन चालकांना दिलासा मिळाला आहे. मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील सातीवली, जव्हार फाटा, नांदगाव आणि तलासरी हद्दीतील चार अपघातप्रवण ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत एक ते दीड वर्षापूर्वी उड्डाणपूलांच्या कामांना सुरुवात करण्यात आली. या चार ही ठिकाणी भरधाव वेगाने ये जा करणाऱ्या वाहनांच्या वेगाचा अंदाज न आल्याने विशेषतः रात्रीच्या अंधारात चारचाकी व दुचाकी वाहनांचा महामार्ग ओलांडताना वारंवार अपघात होऊन त्यामध्ये आत्तापर्यंत अनेक नागरिकांचा बळी गेला आहे. वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर या अपघातप्रवण ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याची अनेक वर्षांपासूनची मागणी स्थानिकांनी रेटून धरली होती. उड्डाणपूल उभारणीस दिरंगाई होत असल्याच्या विरोधात जव्हार फाटा येथे राजकीय पक्ष आणि संतप्त नागरिकांकडून महामार्गावरील वाहतूक रोखण्याचे आंदोलन देखील करण्यात आले होते






**सोमवार**

**०२ जून २०२५**

**मेष**

भविष्यात तुम्हाला भरपूर लाभ मिळतील. दिवस तुमच्यासाठी चैतन्यपूर्ण व चांगला जाणार आहे.

**वृषभ**

एखाद्या गोष्टीबद्दल थोडे गोंधळलेले असाल, मित्रासोबत दिवस शेअर केल्यास तुम्हाला आराम मिळेल.

**मिथुन**

आज तुम्ही नवीन वाहन खरेदी करण्याचा निर्णय घेऊ शकता. दिवस खूपच चांगला जाणार आहे.

**कर्क**

आज ऑफिसमध्ये कामाचा ताण वाढू शकतो. तुमच्या जवळच्या व्यक्तीकडून काही बक्षिस मिळेल.

**सिंह**

या राशीच्या लोकांना त्यांच्या मेहनतीचे सकारात्मक परिणाम मिळतील. सबुरीचं फळ मिळेल.

**कन्या**

आज आत्मविश्वास वाढेल. कोणतीही योजना सुरू करण्यासाठी दिवस तुमच्यासाठी चांगला आहे.

**तूळ**

वेळ वाया न घालवता आणि रखडलेली कामे पुन्हा सुरू केल्यास त्याचा फायदा होऊ शकतो.

**वृश्चिक**

जोडीदारासोबत कुठेतरी फिरण्याची योजना बनू शकते. दिवस तुमच्यासाठी खास असणार आहे.

**धनु**

कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील. दिवस उत्तम राहील. व्यवहारात थोडे सावध राहावे.

**मकर**

आर्थिक लाभाचे नवीन स्रोत दिसू शकतात. कौटुंबिक कामासाठी तुम्हाला प्रवास करावा लागू शकतो.

**कुम्भ**

तुम्ही अशा व्यक्तीला भेटू शकता जो तुम्हाला भविष्यात खूप फायदे देऊ शकेल. खर्चावर नियंत्रण ठेवा.

**मीन**

आज तुमचा दिवस आनंदाचे क्षण घेऊन आला आहे. आवश्यक नसलेल्या कामांमध्ये रमू नका.

## दु:खद निधन



श्री साईनाथ गुरुनाथ शेटे ह्यांचे दुःखद निधन झाले आसून ईश्वर त्यांच्या आत्म्यास चीःर शांति देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना त्यांच्या कुटुंबियाना दूःख सहन करण्याची इश्वर शक्ती देवो

# खेळताना विजेचा धक्का लागून चौदा वर्षीय मुलाचा मृत्यू



## बदलापूर गावातील घटनेने हळहळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूरः** बदलापूर गावातील अमृत टॉवर या गृहसंकुलात असलेल्या उद्यानात उघड्या विजेच्या तारांच्या संपर्कात आल्याने एका १४ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या उद्यानात असलेल्या एका पथदिव्याच्या तळाला वाहिन्या उघड्या होत्या. त्याच्याशी संपर्क झाल्याने या मुलाला जोरदार धक्का बसला. याप्रकरणी गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

गेल्या काही दिवसात विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत. अंबरनाथ शहरात पावसात लघुशंकेसाठी गेलेल्या एका तरुणाला विजेच्या धक्क्याने आपला जीव गमवावा लागला. याप्रकरणी महावितरणचा सबंधित कर्मचारी आणि ज्यांच्या जागेत वाहिन्या उघड्या होत्या अशा दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर त्यापूर्वी अवकाळी पावसात विजेच्या कोसळलेल्या तारांच्या संपर्कात आल्याने जांभूळ गावातील एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. यावेळी तीन म्हशींचा मृत्यू झाला. या घटनांना महिना उलटत नाही तोच अशीच एक घटना बदलापुरात समोर आली आहे.

बदलापूर पश्चिमेत बदलापूर गावात बोराडपाडा रस्त्यावर अमृत टॉवर हे भव्य गृहसंकुल आहे. या गृहसंकुलात एक लहानसे खासगी उद्यान आहे. गृहसंकुलाच्या वतीने याचे व्यवस्थापन पहिले जाते अशी प्राथमिक माहिती आहे. या उद्यानात खेळण्यासाठी आपल्या मित्रांसोबत गेलेल्या या १४ वर्षाच्या मुलाला उद्यानात असलेल्या पथदिव्याच्या येथे विजेचा जोरदार धक्का बसला. या ठिकाणी विद्युत वाहिनी उघडी करून ठेवण्यात आली होती अशी माहिती स्थानिकांनी दिली आहे. या वहिनीच्या संपर्कात आल्याने त्याला जोरदार धक्का बसला. यानंतर त्याला तातडीने सुरुवातील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. तेथून त्याला ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथे त्याला मृत घोषित करण्यात आले. या दुर्दैवी घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होते आहे. याप्रकरणाची माहिती मिळताच बदलापूर पश्चिम पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिस जागेचा पंचनामा करत असून लवकरच याप्रकरणी दोषींवर गुन्हा दाखल केला जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

# विजेच्या लपंडावामुळे शहापूरातील व्यापाऱ्यांचा संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर तालुक्यात वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने येथील व्यापारी संतापले आहेत. सर्व व्यापाऱ्यांनी एकत्रित येत शनिवारी महावितरण कार्यालयाला भेट दिली. महावितरण विभागाकडून दुरुस्तीचे काम केल्यानंतरही वारंवार वीज पुरवठा खंडित होत असून हा वीज पुरवठा सुरळित करावा अशी मागणी यावेळी व्यापाऱ्यांनी केली. या मागणीची दखल घेत, महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी वीज पुरवठा सुरळीत करण्याचा सकारात्मक निर्णय घेतला. गेल्या काही दिवसांपासून अवकाळी पावसामुळे शहापूर तालुक्यात वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. सततच्या खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे नागरिकांसह व्यापारी आणि लघु उद्योजक त्रस्त झाले आहेत. महावितरण विभागाकडून वारंवार दुरुस्तीचे काम केले जात असतानाही वीज पुरवठा दहा तासाहून अधिक वेळ खंडीत होतो. त्यामुळे संतप्त व्यापाऱ्यांनी महावितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देऊन वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली.

यावेळी शहापूर तालुक्यातील रामबाग येथे व्यावसायिक जोडणीसाठी स्वतंत्र रोहित्र बसवणे, शहरातील अन्य रोहित्र वरील अनावश्यक जादा भार कमी करणे, ब्राह्मण आळी, खालचा नाका, सावंत विहार, माने नगर तसेच पंडित नाका येथे नव्याने जादा रोहित्र बसविण्यात येणार आहेत. येत्या आठ दिवसात उपाययोजना आणि आवश्यक दुरुस्ती करून वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा नियमित करणे, अपुरा कर्मचारी वर्ग तातडीने भरणे, दुरुस्तीसाठी दुपारी दोन वाजेपर्यंत वीज पुरवठा बंद करणे असे विविध निर्णय महावितरणचे उप विभागीय अभियंता यादव इंगळे यांच्या सोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आले.

यावेळी व्यापारी मंडळाचे अध्यक्ष गौरी अग्रवाल, किशोर गुजराथी, किशोर अग्रवाल, यशवंत गुजरे, विशाल मडके, योगेश शहा, जयवंत जोशी यांसह महावितरणचे शहापूर शहर अभियंता आदित्य जोशी उपस्थित होते.

## महावितरणच्या कल्याण परिमंडळात वीज सुरक्षेसाठी मॅरेथॉन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. १ (वार्ताहर)** महावितरणच्या २०व्या वर्धापन दिनानिमित्त 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन १ ते ६ जूनदरम्यान राज्यभरात वीज सुरक्षा सप्ताहाचे आयोजन केले आहे. त्यानुसार कल्याण परिमंडलात रविवारी (ता. १) सकाळी मॅरेथॉनच्या सुरक्षा सप्ताहाचा प्रारंभ करण्यात आला. 'आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार' हे ब्रीद घेऊन वीज सुरक्षेबाबत जनजागृती करीत निघालेल्या कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या मॅरेथॉनचे नेतृत्व कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा यांनी केले. महावितरणचा २०वा वर्धापन दिन शुक्रवारी (ता. ६) साजरा होत आहे. यानिमित्ताने सप्ताहात वीज सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत विविध उपक्रम आयोजित केले आहेत.

# कारवाईचा दिखावा : वालधुनी नदी पुन्हा प्रदूषित झाली !

## उल्हासनगरात वडोल भागाजवळ नदीच्या पाण्यावर फेस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर : प्रदुषणामुळे गटारगंगा झालेल्या वालधुनी नदीच्या पुनरूज्जीवनासाठी ठोस काही होत नसतानाच वालधुनीत मात्र रासायनिक सांडपाणी मिसळत असल्याचे समोर आले आहे. शनिवारी उल्हासनगरच्या वडोल भागातून वाहणाऱ्या वालधुनी नदीवर फेस पाहायला मिळाला. संपूर्ण नदीच्या पात्रात फेस पसरल्याचे दिसत होते. त्यामुळे पुन्हा नदीत प्रदुषणकारी घटक मिसळल्याचा आरोप होत होता.**



गेल्या काही वर्षात अंबरनाथ आणि उल्हासनगर शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीची गटारगंगा झाली. अंबरनाथ शहरातून सुरुवात होणाऱ्या या नदीत विविध नागरी सांडपाणी वाहून नेणारे नाले मिसळतात. येथे देशातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत आहे. या औद्योगिक वसाहतीतील विविध कंपन्यांकडून अनेकदा प्रक्रिया न केलेले सांडपाणी नाल्यात सोडले जाते. हे नाले वालधुनी नदीला येऊन मिळतात. त्यामुळे नदीची दुरावस्था वाढली आहे. मधल्या काळात उल्हासनगर शहरात जीन्स धुलाई कारखान्यामुळे मोठे प्रदूषण झाले होते. शेकडो लहान मोठे जीन्स धुलाई कारखाने थेट वालधुनी नदीत सांडपाणी सोडत होते. परिणामी याविरुद्ध सामाजिक संस्थेने राष्ट्रीय हरित लवाद आणि सर्वोच्च न्यायालयात धाव घेतल्याने याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेत या कारखान्यांना सांडपाणी प्रक्रिया केंद्र सक्तीचे केले. त्यामुळे हे कारखाने बंद पडले. मात्र त्यानंतर आजही वालधुनी नदीत सांडपाणी मिसळत असल्याचे समोर आले आहे. शनिवारी उल्हासनगर शहरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीत फेस पाहायला मिळाला. वडोल परिसरातून वाहणाऱ्या वालधुनी नदीच्या पात्रात मोठा फेस पसरला होता. या फेसाचे प्रमाण इतके होते की देशाची नदी वाहते की काय असा प्रश्न उपस्थित होतो आहे. पावसाचा फायदा घेत यापूर्वीही अनेकदा अनेक कंपन्यांनी रासायनिक सांडपाणी थेट वालधुनी नदीत सोडल्याचे समोर आले होते. यंदाही असाच प्रकार झाला असल्याची शक्यता पर्यावरण प्रेमींनी व्यक्त केली आहे.

# मिरा भाईंदर पालिकेच्या बस थांब्याच्या साहित्याची चोरी

## महापालिकेचे लाखोंचे नुकसान

## प्रवाशांची गैरसोय

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा भाईंदर शहरातील स्टीलने उभारण्यात आलेल्या बस थांब्याचे साहित्य चोरीला जात असल्याचे समोर आले आहे. यामुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असून महापालिकेचेही लाखोंचे नुकसान झाले आहे.



मिरा भाईंदर महापालिकेने नागरिकांच्या सोयीसाठी शहरातील विविध भागांत आधुनिक व टिकाऊ अशा स्टील बस थांब्याची उभारणी केली आहे. शहरात सध्या पंधराहून अधिक बस थांबे आहेत. या थांब्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करण्यात आला असून, ही टिकावीत अशी अपेक्षा होती. मात्र सध्या या थांब्यांची दुरवस्था झाली असून, काही ठिकाणी साहित्य चोरीला गेल्याचे निदर्शनास येत आहे.

याआधी शहरातील नाल्यांवरील लोखंडी झाकणे व पदपथांवरील जाळ्या चोरीला गेल्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे आता बस स्थानकांचे साहित्यही चोरीला जात असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तथापि, पालिका प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याने प्रवाशांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. अद्याप या संदर्भात कोणतीही अधिकृत तक्रार दाखल झालेली नसली, तरीही लवकरच शहरातील सर्व बस स्थानकांचे सर्वेक्षण करण्यात येईल, अशी माहिती महापालिकेच्या परिवहन विभागाकडून देण्यात आली आहे.

मिरा भाईंदर शहरात सिमेंट रस्त्यांच्या उभारणीसाठी काही बस थांबे तात्पुरते हटवून रस्त्याच्या कडेला ठेवण्यात आले होते. मात्र रस्त्यांचे काम पूर्ण होऊनही हे बस थांबे मूळ जागी पुन्हा बसवण्यात आलेले नाहीत. विशेष म्हणजे, यापूर्वी कडेला ठेवलेले काही बस थांबेदेखील आता गायब झाले आहेत. त्यामुळे हे थांबे नक्की कुठे गेले असा प्रश्न प्रवाशांमधून उपस्थित केला जात आहे.

# सावरकरनगर परिसरात भुरट्या चोरांचा सुळसुळाट

## ओंकारेश्वर गणेशोत्सव मंडळाकडून जनजागृती सभेचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : अर्जुन चेमटे

ठाण्यातील सावरकर नगर परिसरात भुरट्या चोरांचा सुळसुळाट झाला असून चोरटे रस्त्यावरील पथदिवे बंद करून चेन स्नाचिंग, बाईक चोरी, महिलांची छेडछाड यासारखे गंभीर अपराध करत आहेत. या गंभीर समस्येकडे पोलीस प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी तसेच जनजागृतीसाठी शिवसेना गटनेता तथा मा. नगरसेवक दिलीप चंद्रकांत बारटक्के यांचे मार्गदर्शनाखाली ओंकारेश्वर गणेशोत्सव मंडळ, म्हाडा वसाहत, ठाणे येथे जनजागृती सभेचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी वर्तक नगर पोलीस स्टेशनसावरकर नगर परिसरातील बीट मार्शल एस. एस. जट्टे व पो. कॉ. राजू मुसळे यांनी परिसरात एखादी घटना घडत आहे किंवा रिक्षामध्ये कोणी दारू, शिगारेट पीत आहेत, सार्वजनिक ठिकाणी आरडाओरडा करणे तसेच शाळेसमोर, सार्वजनिक ठिकाणी गर्दी करुन छेडछाडीचा प्रकार तुमच्या निदर्शनास आल्यास अशा वेळेस घाबरून न जाता तात्काळ मदतीसाठी बीट मार्शल म्हणून आमचे नंबर तर तुमच्याकडे आहेतच. परंतु त्याही पेक्षा जास्त जलद गतीने मदत हवी असेल तर 112 नंबर वरती डायल करा अवघ्या काही मिनिटात किंवा पाच मिनिटात तुमच्या तक्रारीची दखल घेऊन तुम्हाला मदत केली जाईल. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता जास्तीत जास्त 112 चा वापर करावा. कसलीही भिती मनात ठेवू नाका. पोलीस आपले सोबत आहे. असे जनजागृतीकरत जनतेने काय काळजी घ्यावे याचे मार्गदर्शन करून नागरिकांना धीर दिला.

**परिसरात एखादी घटना घडत आहे, रिक्षामध्ये कोणी दारू, शिगारेट पीत आहेत, सार्वजनिक ठिकाणी आरडाओरडा करणे तसेच शाळेसमोर, सार्वजनिक ठिकाणी गर्दी करुन छेडछाडीचा प्रकार तुमच्या निदर्शनास आल्यास अशा वेळेस घाबरून न जाता तात्काळ मदतीसाठी बीट मार्शल म्हणून आमचे नंबरवर तसेच त्याही पेक्षा जास्त जलद गतीने मदत हवी असेल तर 112 नंबर वरती डायल करा अवघ्या पाच मिनिटात तुमच्या तक्रारीची दखल घेऊन तुम्हाला मदत केली जाईल. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता जास्तीत जास्त 112 चा वापर करावा. कसलीही भिती मनात ठेवू नाका. पोलीस आपले सोबत आहे.**

**- पो.कॉ.राजू मुसळे व पोलीस नाईक एस.एस.जट्टे**

# भाजपाच्या वसई विरार जिल्हाध्यक्षपदी प्रज्ञा पाटील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** भाजपाच्या वसई विरार जिल्हाध्यक्षपदाच्या शर्यतीत पक्षाच्या फायरब्रँड नेत्या म्हणून ओळख निर्माण झालेल्या प्रज्ञा पाटील यांनी अनपेक्षितपणे बाजी मारली आहे. शनिवारी त्यांची पक्षाच्या वसई विरार जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती जाहीर करण्यात आली. वसईतील त्या भाजपच्या पहिल्याच महिला जिल्हाध्यक्ष ठरल्या आहे. विधानसभा निवडणुकीच्या आदल्या दिवशी विवांता हॉटेलात झालेल्या राजकीय नाट्याच्या वेळी प्रज्ञा पाटील यांनी एकाकी खिंड लढवून बविआच्या दिग्गजांना रोखून धरले होते. त्याची दखल पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी घेतली होती. त्यामुळेच त्यांची निवड झाली असल्याचे बोलले जात आहे.



लोकसभा व विधानसभा निवडणुकांमध्ये वसई विरार शहरात सर्वाधिक मताधिक्य मिळवीत भाजपने मोठे यश संपादन केले होते. त्यामुळे आगामी काळात महापालिका निवडणुक, जिल्हा परिषद, पंचायत समिती अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही आपले वर्चस्व सिद्ध करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. सध्या भाजपने संघटनात्मक बांधणी सुरू केली होती. राज्यातील सर्व जिल्ह्यात नवीन जिल्हाध्यक्षांची नियुक्ती जाहीर करण्यात आली होती. मात्र वसई विरारच्या जिल्हाध्यक्षपद कुणाला मिळणार ते गुलदस्त्यात होते. शनिवारी अखेर भाजपने २२ जिल्हाध्यक्ष पदाची यादी जाहीर केली. यात वसई विरार साठी एका महिला कार्यकर्त्या असलेल्या प्रज्ञा पाटील यांची जिल्हाध्यक्षा म्हणून नियुक्त केली आहे. प्रथमच वसई विरार मध्ये भाजपने महिला नेतृत्वाला जिल्हाध्यक्ष पदाची संधी दिली आहे.

# चोरीस गेलेल्या तीन महिन्याच्या बाळाचा एका दिवसात शोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल :** पनवेल रेल्वे स्थानकासमोरील झोपडपट्टीतून शुक्रवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास बाळ चोरीस गेल्याने पोलीस तपास करत होते. बाळाला चोरलेल्या महिलेने पनवेल ते पुणे असा रेल्वे प्रवास करुन पोलिसांना चकवले. अखेर हे बाळ कळंबोली पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक महिला अधिका-याच्या नजरेस दिसले आणि बाळाला सुखरुप आईपर्यंत पोलिसांनी पोहचवले. पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार रेल्वे स्थानकासमोरील झोपडपट्टीत राहणारी २५ वर्षीय देवचना भोसले या शुक्रवारी त्यांचे तीन महिन्यांच्या बाळाला घेऊन झोपले असताना शेजारी राहणारी रोशनी विनोद वाघेश्री हीने बाळ पळवले. पोलीस अधिकारी ठाकरे यांनी याबाबत गुन्हा नोंद केल्यावर बाळाच्या शोधासाठी पाच पोलीस पथके नेमली. संशयीत महिला रेल्वे स्थानकातून पुण्याकडे जाणाऱ्या रेल्वेत बसल्याचे समजल्यावर पोलीसांच्या विविध पथकांनी लोणावळा, दौंड, कर्जत व पुणे येथे जाऊन महिलेचा शोध घेतला. मात्र पोलिसांना गुंगारा देऊन संशयीत महिला कळंबोलीत परतली. या दरम्यान सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके यांना कळंबोली अग्निशमन दलाच्या इमारतीकडे ही महिला बाळासह दिसली. सहाय्यक पोलीस निरीक्षक शेळके यांनी महिलेची चौकशी केल्यावर त्या महिलेने हे बाळ तीचे नसल्याचे कबूल केले. अखेर या महिलेला ताब्यात घेतल्याची माहिती कळंबोलीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी पनवेल शहर पोलिसांना कळवली. सर्व कायदेशीर सर्व प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर बाळाला त्याच्या आईच्या स्वाधीन शनिवारी करण्यात आले. या महिलेने हे बाळ का चोरले याचा तपास पोलीस करीत आहेत.



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे ■ सोमवार ■ ०२ जून २०२५

jeevandeepvartanews2020@gmail.com



# मुरबाड मध्ये एक जुनलाच पावसाची दमदार हजेरी!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड दि.१-** मुरबाड तालुक्यात ग्रामीण भागात तसेच आदिवासी पट्टयात व मुरबाड परिसरात गेले तीन ते चार दिवस पावसाने चांगल्या प्रकारे विश्रांती घेतली होती परंतु खऱ्या अर्थाने एक जूनच्या आगमनलाच रविवारी सव्वा बारा वाजण्याच्या दरम्यान पावसाने मुरबाडमध्ये जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे गेले तीन-चार दिवस उष्ण घामाने हैराण झालेल्या नागरिकाला थोडासा हवेतील गारवाचा दिलासा मिळाला.असाच पाऊस जर पडत राहिला तर शेतकरी वर्ग भात पेरणीला लवकरात लवकर सुरुवात करतील अशा प्रकारचा अंदाज शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे तसेच तालुक्याच्या प्रमुख बाजारपेठेत सोमवारी भात बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची झुंबड उडणार शेतकऱ्यांनी दिली आहे.



## इन्फिगो आय केअर तर्फे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर!

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुरबाड दि.३१ :: बाळासाहेब भालेराव**

मुरबाड तालुक्यात गेली चार वर्ष यशस्वीरित्या कार्यरत असून मुरबाड तालुक्यात डोळ्यांविषयी जनजागृती करणारे एकमेव विश्वसनीय केंद्र म्हणजे इन्फिगो आय केअर हॉस्पिटल यांच्या माध्यमातून मुरबाड तालुक्यात आर्थिक दृष्ट्या दुर्बल तसेच गरजू नागरिकांसाठी मोतीबिंदू जागृती अभियाना अंतर्गत इन्फिगो आय केअर हॉस्पिटल व नरिथम सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने मुरबाड तालुक्यातील नागरिकांसाठी मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरात आर्थिक दृष्ट्या दुर्बल तसेच गरजू नागरिकांनी सहभाग नोंदवून आपल्या डोळ्यांची परिपूर्ण नेतृत्व तपासणी करून आमच्या सुप्रसिद्ध नेत्र तज्ञ यांच्याकडून डोळ्यांची शस्त्रक्रिया करून घ्यावी असे आव्हान इन्फिगो आय केअर हॉस्पिटल चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. श्रीधर ठाकूर यांनी केले असून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात मोफत शस्त्रक्रियेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आधार कार्ड झेरॉक्स, पासपोर्ट साईज फोटो, रेशन कार्ड झेरॉक्स मोबाईल नंबर इत्यादी कागदपत्रे घेऊन इन्फिगो आय केअर मुरबाड हॉस्पिटलला भेट देऊन आपली नाव नोंदणी करणे आवश्यक्य आहे . नाव नोंदणी केलेल्या नागरिकांना वरील सवलतीचा लाभ देण्यात येईल अशी माहिती इन्फिगो आय केअर हॉस्पिटल मुरबाडचे केंद्रप्रमुख रोहित झुंजारराव यांनी दिली आहे नाव नोंदणीची प्रक्रिया १ जून २०२५ पासून सुरू होत आहे. नाव नोंदणीसाठी संपर्क रोहित झुंजारराव यांच्याशी साधावा असे आव्हान इन्फिगो आय केअर हॉस्पिटलने केले आहे.

## पेण शहरात एक्कावन्न इमारती धोकादायक

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**पेण :: प्रतिनिधी**

पेण शहरातील नागरिक आपला जीव मुठीत धरून जुन्या पडझड झालेल्या तसेच धोकादायक इमारती मध्ये राहत असल्याने पावसात या धोकादायक इमारती कोसळून मोठी जिवीतहानी होण्याची शक्यता असल्याने नगरपालिकेकडून यावर्षी अतिधोकादायक मध्ये असलेल्या एकूण ५१ इमारतींना नोटीस देण्यात आल्या आहेत यात १४ जुन्या झालेल्या तर ३७ धोकादायक इमारतींचा समावेश आहे. धोकादायक इमारती मध्ये राहत असलेल्या नागरिकांनी त्वरित सुरक्षितस्थळी स्थलांतरित व्हावे असे आवाहन नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक जीवन पाटील यांनी केले आहे. यावर्षी मान्सूनपूर्व पाऊस सुरू झाल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली आहे वादळी वाऱ्यात पावसाचा जोर वाढून धोकादायक इमारतींना याचा मोठा फटका बसून इमारती कोसळण्याची घटना घडून जिवित हानी होऊ नये यासाठी नगरपालिकेकडून पेण नगरपालिका हद्दीतील धोकादायक अशा ५१ इमारती मालक, सोसायटी यांना नोटीस देऊन सुरक्षिततेबाबत आवाहन केले आहे.

**नागरिकांनी सुरक्षितस्थळी स्थलांतरित व्हावे - मुख्याधिकारी जीवन पाटील**

## काशिनाथ (आबा) झुंजारराव यांचे मराठा समाजासाठी उल्लेखनीय काम!

### कपिल पाटील यांचे उद्गार !

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**मुरबाड दि.३१ (प्रतिनिधी )**

ठाणे जिल्हासह मुरबाड तालुक्यात मराठा समाजासाठी काशिनाथ (आबा) झुंजारराव यांचे खूप उल्लेखनीय काम होते त्यांच्या जाण्याने आज मराठा समाजाची मोठी हानी झाली असून त्यांच्या कार्याची दखल इतर समाजाने सुद्धा घेऊन समाजाप्रती काम करावे असे उद्गार माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी शुक्रवार .३०मे २०२५रोजी काशिनाथ झुंजारराव यांच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सात्वन केले त्यावेळी केंद्रीय पंचायत राज माजी मंत्री कपिल पाटील उद्गार काढले व भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## उपविभागीय पोलिस अधिकारी जगदिश शिंदे यांची सेवापुर्ती




● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**मुरबाड-प्रतिनिधी :: दिलीप पवार**

महाराष्ट्र पोलीस दलात एक उत्तम जनसेवा करून मुरबाड चे उपविभागीय पोलिस अधिकारी जगदिश शिंदे हे नियत वयोमानानुसार 31 मे रोजी पोलीस दलातून सेवा निवृत्त झाले आहेत. मुळचे पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्याचे भूमिपुत्र असलेले शिंदे हे शांत ,संयमी व दिलदार व्यक्तीमत्व आहेत. त्यांनी अनेक वर्ष महाराष्ट्राची पोलीस दलाच्या माध्यमातून जनतेची सेवा केली आहे.

त्यांच्या 31 मे रोजी सेवापुर्ती निमित्ताने मुरबाड पोलीस स्टेशनच्या वतिने भव्य असा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित केला होता. सकाळपासूनच शुभेच्छांसाठी गर्दी झाली होती. यावेळी ठाणे जिल्ह्यातिल अनेक आजी- माजी पोलीस अधिकारी,कर्मचारी, राजकीय , सामाजिक, पत्रकारिता क्षेत्रातील व्यक्तींनी उपस्थित राहून त्यांना पुढील भावी निरोगी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सेवापुर्ती समारंभासाठी त्यांचे कुटुंबिय सुद्धा उपस्थित होते.शिंदे यांना शुभेच्छा देताना पोलीस कर्मचारी व मित्र परिवारास गहिवरून आले होते.

# पनवेल महापालिका क्षेत्रात पूर्वीप्रमाणेच वीस प्रभागांत ७८ नगरसेवक ?

### प्रभाग रचना आहे तशीच ठेवण्याच्या हालचाली




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पनवेल, ता. १** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. दोन टप्प्यात निवडणुका होतील, असे संकेत प्रशासनाने दिले आहेत. २०१७ प्रमाणेच प्रभाग रचना ठेवण्याच्या दृष्टिकोनातून सरकार विचाराधीन आहे. त्यामुळे पनवेल महापालिका क्षेत्रात पूर्वीप्रमाणेच २० प्रभागांत ७८ नगरसेवकांची संख्या राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे एक-दोन वर्षांपासून आपल्या प्रभागाची बांधणी करणाऱ्या इच्छुकांना दिलासा मिळणार आहे. २०१६ ला पनवेल महापालिकेची स्थापना झाली. पनवेल नगर परिषदेचा पूर्वीचा भाग, सिडको वसाहती आणि २९ महसुली गावांचा यामध्ये समावेश करण्यात आला. ११० किलोमीटर क्षेत्रफळ असणाऱ्या महापालिकेची पहिली निवडणूक २०१७ मध्ये झाली. त्या वेळी २०११ च्या जनगणनेनुसार प्रभाग रचना होती. समाविष्ट गाव आणि खारघर असे १ ते ६ अशी प्रभागांची संख्या आहे. कळंबोली वसाहती ७, ८, ९ आणि १० असे प्रभाग आहेत. क्रमांक ९ मध्ये आसूड गाव, वळवली, टेंभुर्डे, खिडुकपाडा या गावांचा समावेश आहे. ११ ते १३ क्रमांकाच्या प्रभागात विशेषकरून कामोठेचा भाग येतो. त्याचबरोबर १४ मध्ये खांदा गाव तसेच पनवेलच्या काही परिसराचा समावेश करण्यात आला आहे. १५ मध्ये संपूर्ण खांदा वसाहत असून, १६, १७ प्रभागात नवीन पनवेल समाविष्ट आहे. तसेच १८ आणि १९ या प्रभागात संपूर्ण पनवेल शहर सामावून घेण्यात आलेले आहे. प्रभाग २० मध्ये तक्का, पोदी आणि काळुंद्रे गाव येते. अशा प्रकारे पूर्वीची प्रभाग रचना असून, मध्यंतरी महाविकास आघाडीने एक सदस्य रचना केली होती. त्याचबरोबर सदस्य संख्याही वाढवली होती.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महायुती सत्तेत आल्यानंतर हा निर्णय रद्द करून पुन्हा बहुसंख्य सदस्य रचना करण्याचे ठरले. मध्यंतरी ओबीसी आरक्षणामुळे निवडणुका रखडल्या. सर्वोच्च न्यायालयाने ६ मे रोजी यासंदर्भात निकाल देत चार महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार राज्यभर हालचाली सुरू झाल्या आहेत. २०१७ प्रमाणेच प्रभाग रचना करण्याबाबत राज्य सरकार विचाराधीन आहे. त्यामुळे पूर्वीप्रमाणेच प्रभाग कायम राहतील, अशी दाट शक्यता आहे.

> **कोरोना आणि त्यानंतर ओबीसी आरक्षणामुळे निर्माण झालेला तिढा या कारणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडल्या. त्यामुळे या ठिकाणी लोकप्रतिनिधी नसून प्रशासक कामकाज करतात. सर्वोच्च न्यायालयाने लवकरात लवकर निवडणुका घेण्याचे आदेश दिल्यानंतर त्या विहित मुदतीत होणे गरजेचे आहे. राज्य सरकार जो निर्णय घेईल त्याप्रमाणेच प्रभाग रचना होतील, अशी एकंदर स्थिती आहे.**
>
> **- अमोल बोडके, राजकीय अभ्यासक**

# केडीएमसी अधिकाऱ्यांनी केली पिसवली प्रभागाची पाहणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** पिसवली प्रभागातील शिवसेनेचे पदाधिकारी तथा शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष कल्याण ग्रामीण शहरप्रमुख अमित कोळेकर यांच्या पुढाकाराने नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी विकासमय पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या पाहणी दौऱ्यात केडीएमसी सहायक आयुक्त भारत पवार व इतर अधिकारी तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

पिसवली प्रभागातील शिवसेनेचे अमित कोळेकर यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे सहा आयुक्त भारत पवार यांची भेट घेऊन प्रभागातील विविध प्रश्नांना वाचा फोडली व प्रभागामध्ये



पाहणी दौरा करण्याचे निवेदन दिले होते. त्याला अनुसरून सहा आयुक्तांनी देखील तात्काळ प्रतिसाद देत नागरिकांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शनिवारी पिसवली प्रभागामध्ये अमित कोळेकर यांच्या पुढाकाराने पाहणी तथा नागरिकांचे प्रश्न सोडवणूक दौरा पार पडला. त्यावेळी मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर उतरलेले दिसले. या दौऱ्या मुळे प्रभागातील नागरिकांना एकप्रकारचा दिलासा मिळाला असून, तसेच आतापर्यंत कोणीही हा उपक्रम पिसवली प्रभागात राबवला नसून, अमित कोळेकर यांच्या माध्यमातून नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे नेतृत्व उदयास आले आहे असा सुर नागरिकांकडून येताना दिसला.

# आरटीओमध्ये सरकारी गणवेशात तोतया ?

### मोटार वाहन निरीक्षक गाडीत बसून, कारवाईसाठी छायाचित्रे काढतोय खासगी व्यक्ती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** देवनार येथे मोटार वाहन निरीक्षक गाडीत बसून, त्यांचा वाहनचालक नियमभंग करणाऱ्या गाड्यांचे छायाचित्र टिपत असल्याचा प्रकार घडला आहे. मोटार वाहन निरीक्षकाने कार्यवाही करणे अपेक्षित असताना, वाहनचालकाला कारवाई करण्यास पाठविल्याचा अजबगजब कारभार परिवहन विभागात घडला आहे. तसेच संबंधित वाहनचालक कोणत्याही शासकीय, निमशासकीय किंवा कंत्राटी कर्मचारी नसून देखील शासकीय गणवेश परिधान करून, सरकार आणि सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक करत असल्याचे निष्पन्न होत आहे. दरम्यान या संपूर्ण प्रकरणी मोटार वाहन निरीक्षक सचिन पाटील यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

नियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी मोटार वाहन निरीक्षक सचिन पाटील देवनार येथे गेले होते. यावेळी त्यांनी स्वतः कारवाई करणे अपेक्षित होती. परंतु, ते शासकीय वाहनात बसून राहिले होते. तर, त्यांचा खासगी वाहनचालक वैभव फडतरे हा एका रस्त्यावर वाहनाचे, बसचे छायाचित्र काढत होता. यावेळी एका जागृत नागरिकाने याबाबत फडतरेला विचारणा केली असता, त्याने तेथून काढता पाय घेतला. नागरिकाने सचिन पाटील यांच्याकडे वाहन चालक कारवाईची छायाचित्रे काढू शकतो का, अशी विचारणा केली. तेव्हा सचिन पाटील म्हणाले की, त्याला छायाचित्रे काढण्यासाठी आम्हीच पाठवले. कारवाई आम्ही करत आहे, तो फक्त छायाचित्र काढत आहे, अशा आशयचा व्हिडीओ समाज माध्यमावर प्रसारित झाला. परंतु, यामधील वैभव फडतरे हा खासगी व्यक्ती असून देखील त्याने शासकीय गणवेश घातला होता. तसेच, तो शासकीय कारवाई करत होता, अशी माहिती मिळत आहे. त्यामुळे खासगी व्यक्तीला शासकीय गणवेश देऊन, त्याला शासकीय कारवाई करण्याच्या सूचना कोणी दिल्या, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. खासगी व्यक्तीने शासकीय गणवेश घालणे गुन्हा असून, यामुळे सर्वसामान्य नागरिकांची फसवणूक केली जात आहे. दरम्यान या संपूर्ण प्रकारानंतर मोटार वाहन निरीक्षक सचिन पाटील यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याची माहिती परिवहन विभागातील अधिकाऱ्याने दिली. याप्रकरणी सह परिवहन आयुक्त रवी गायकवाड यांना चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती कळत आहे.

# 'शॉर्टकट'च्या मोहापायी अपघाताचा धोका

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

प्रवाशांनी जीव धोक्यात घालून रुळ ओलांडू नये म्हणून रेल्वे प्रशासनाने हार्बर रेल्वे मार्गावरील दिघा ते पनवेल तसेच वाशी ते बेलापूर स्थानकांमध्ये फलाटाच्या दोन्ही टोकांवरील रॅम्प हटवून त्या ठिकाणी लोखंडी रेलिंग बसवले आहे. काही ठिकाणी तर भिंतीही बांधण्यात आल्या आहेत. मात्र, अशा सर्व अडथळ्यांवर मात करत प्रवासी रुळ ओलांडतात. प्रवाशांनी फलाटावरील जिन्यांनी न जाता थेट रेल्वे रुळ ओलांडत प्रवास करण्याचा 'शॉर्टकट' मार्ग स्वीकारल्यामुळे अपघाताचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शॉर्टकटच्या मोहात पडत असून आपली सुरक्षाच धोक्यात घालतात.





डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली

# महिलासंबंधी गुन्ह्यात ४८ तासांत दोषारोपपत्र दाखल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** महिलांच्या संबंधित तीन गुन्ह्यात कल्याण परिमंडळ ३ च्या पोलिसांनी ४८ तासाच्या आत दोषारोपपत्र दाखल केले आहे. कल्याण पूर्व येथील कोळशेवाडी, कल्याण पश्चिम येथील बाजारपेठ आणि डोंबिवलीतील मानपाडा पोलिसांनी डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामगिरी केली आहे.

कोणतीही घटना असो पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल दाखल होतो. प्रकरणाच्या सुरू तपास होतो. ९० दिवसांच्या आत पोलिसांना तपास करून या प्रकरणातील दोषारोप पत्र कोर्टात दाखल करायचे असते. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा होईल यासाठी पोलिसांकडे पुरावा गोळा करण्यासाठी ९० दिवसांची वेळ असते कोर्टात आरोप पत्र दाखल झाल्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू होते.

यादरम्यान असे अनेक प्रकार असतात. ज्यामध्ये आरोपींना जामीन देखील मिळून जातो. कल्याण परिमंडळतील पोलिसांनी एक चमकदार कामगिरी केली आहे. कल्याणचे डीसीपी अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांच्या संबंधित गुन्ह्यात ४८तासांच्या आत गुन्हा दाखल करून फक्त आरोपीला अटक नाही. तर कल्याण कोर्टात दोषारोप पत्र देखील दाखल झाले आहे. कल्याणच्या मानपाडा आणि कोळसावाडी पोलीस स्टेशनच्या हद्दीत तसेच बाजारपेठ पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या महिलांसोबत गैर प्रकाराबद्दल या तीन पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला. या तीन पोलीस स्टेशन मधील तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी गुन्हा दाखल केल्यानंतर तपास सुरू केला.

महिलांसोबत घडलेल्या प्रकाराच्या सर्व पुरावा गोळा करण्यात आला. आरोपीला कठोर शिक्षा होईल यासाठी कोणत्याही प्रकारची चूक होऊ नये यासाठी पोलिसांनी अहोरात्र काम केले. आणि अखेर ४८ तासांच्या आत कल्याण कोर्टात आरोप पत्र दाखल करण्यात आला आहे.

# उल्हासनगरात सतरा लाखांचे एमडी ड्रग जप्त

### भालजवळ कारवाई - दोघांना अटक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगरः** उल्हासनगर जवळच्या भाल येथील सीताराम म्हात्रे नगर या परिसरातून ठाणे गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने तब्बल १७ लाखांचा मेफेड्रोन हे अमली पदार्थ जप्त केले आहे. याप्रकरणी हिललाईन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जय संजय रेवगडे आणि साहिल किरण कांगणे या दोघांना अटक करण्यात आली आहे. दोघांकडे अमली पदार्थ सापडल्याने आश्चर्य व्यक्त होते आहे. विशेष म्हणजे उल्हासनगर परिमंडळ चारच्या क्षेत्रात गेल्या काही दिवसात अमली पदार्थांचे सेवण आणि विक्रीबाबत अनेक गुन्हे दाखल होत असताना ही कारवाई गुन्हे शाखेने केल्याने स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते आहे.

गेल्या काही दिवसांपासून परिमंडळ चारमध्ये अमली पदार्थांची विक्री, वाहतूक आणि सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर शहरात अमली पदार्थाच्या आहारी तरूण पिढी गेल्याचे दिसून आले आहे. सार्वजनिक शौचालये, मोकळी मैदाने, निर्जन ठिकाणी अनेक तरूणांना पोलिसांनी अमली पदार्थ असलेल्या गांजा सेवन करताना पकडले आहे. त्यांच्यावर गुन्हाही दाखल करण्यात आला आहे. अंबरनाथमध्ये अमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणावर होत असल्याचा आरोप सामाजिक संघटना आणि नागरिकांनी केला होता. त्यानंतर भगतसिंग नगर परिसरात एकाच आठवड्यात दोनदा कारवाई करण्याची वेळ पोलिसांवर आली. यातही हजारो रूपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. परिमंडळ चारच्या क्षेत्रात या घटना सातत्याने होत असताना पोलिसांकडूनही कारवाई होते आहे. मात्र असे असतानाही अमली पदार्थांची विक्री करण्यासाठी ते पदार्थ बाळगण्याचे प्रकार समोर आले आहे.




'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)

RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी

मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१

E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com